# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११८८
२५६२ ११८९

**शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)**
गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई—मेल : affiliation@pun.unipune.ac.in


**संदर्भ क्र. :** सीए/1340

**दिनांक :** 30/6/23

प्रति,
**मा. अध्यक्ष/सचिव,**
डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे
फर्ग्यसन महाविद्यालय, पुणे ४११००४

**विषय: 'अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा' (Empowered Autonomous College Status) प्रदान करण्याबाबत......**

संदर्भ: १) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार—ब, दि. २२ मे, २०२३.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन चे पत्र क्र. संकीर्ण—२०२३/प्र. क्र.९८/विशि—३, दिनांक २४ मे, २०२३.
३) परिपत्रक क्र. ८६/२०२३, शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७
४) मा. प्राचार्य, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे फर्ग्यसन महाविद्यालय, पुणे ४११००४ यांचे पत्र संदर्भ क्र. एफसीपी/आयक्युएसी/१५३/२०२३—२४, दिनांक ३०/०५/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयास आणि संदर्भीय पत्रांस अनुसरून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या **फर्ग्यसन महाविद्यालय, पुणे ४११००४** या संलग्न महाविद्यालयास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२३ व महाराष्ट्र शासन राजपत्र/अधिसूचना असाधारण भाग चार—ब, दि. २२ मे, २०२३ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ ( स्वायत्त महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा (Empowered Autonomous College Status) देण्याबाबतची मानके) एकरूप परिनियम क्र. १/२०२३, दि. २२.०५.२०२३ च्या तरतूदींच्या, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिसंस्था/नियामक मंडळ आणि भारत सरकार, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, परिनियम, आदेश, मार्गदर्शक तत्वे इ. च्या अधीन राहून, **शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ ते २०३२—२०३३ या दहा वर्षे कालावधीसाठी 'अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा' (Empowered Autonomous College Status)** प्रदान करण्यात येत आहे.

पुढे आपणांस असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २ (६१) अनुसार स्वायत्त महाविद्यालयातील अध्यापकांच्या नेमणुकीस विद्यापीठाची अध्यापक/शिक्षक मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील १०८ मध्ये नमूद संलग्नीकरणाच्या अटी आपणावर बंधनकारक आहेत, याची नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपला,

(डॉ. प्रफुल्ल अ. पवार)
कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
२. मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
३. मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
४. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१
५. मा. सह संचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१
६. मा. मा. प्राचार्य, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे फर्ग्यसन महाविद्यालय, पुणे ४११००४
७. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
९. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०. उपकुलसचिव, छाननी व तालनीकरण कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
११. उपकुलसचिव, प्रमाणपत्र कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१२. उपकुलसचिव, समन्वय कक्ष परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१३. उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१४. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१५. उपकुलसचिव, अंतर्गत गुणवत्ता व सिद्धता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
१६. सहायक कुलसचिव, आरक्षण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१७. सहायक कुलसचिव, मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
१८. सहायक कुलसचिव, मा. प्र—कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
१९. कक्षाधिकारी, डाटा प्रोसेसिंग युनिट, प्रस्तुत विद्यापीठ